**प्रेसनोट** दिनांक – ११/०४/२०२२

**लोकसेवक श्री. शरद विलास गायकवाड, वैदयकीय अधिकारी, गट–अ, प्राथमिक आरोग्य केंद्र, तारापूर, ता.जि. पालघर यांस लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर यांनी घेतले ताब्यात.**

| | | |
|---|---|---|
| १ | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर |
| २ | गुन्हा नोंद पोलीस ठाणे | तारापूर पोलीस ठाणे, जि.पालघर |
| ३ | कलम | भ्र.प्र.अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| ४ | लोकसेवकाचे नाव व कार्यालय | लोकसेवक श्री. शरद विलास गायकवाड, वैदयकीय अधिकारी, गट–अ, प्राथमिक आरोग्य केंद्र, तारापूर, ता.जि.पालघर |
| ५ | मागितलेल्या लाचेची रक्कम | ५००/–रूपये. |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | ५००/– रुपये |
| ७ | थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार यांची मेव्हणी ही प्राथमिक आरोग्य केंद्र, तारापूर येथे आंतररूग्ण म्हणून उपचार घेत असुन आरोपीत लोकसेवक हे तेथे वैदयकीय अधिकारी म्हणून कर्तव्यास आहेत. तक्रारदार यांचे मेव्हणीस आवश्यक असलेले इन्जेक्शन आयर्न सुक्रोज हे प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध असताना प्रति इन्जेक्शन ५००/– रूपये लाच दिल्याशिवाय उपचार करणार नाही अशी मागणी करून ५ पैकी ३ इन्जेक्शनचे १५००/– रूपये लाच यापुर्वीच घेतले व उर्वरित २ इन्जेक्शनसाठी प्रत्येकी ५००/– रूपये लाचेची मागणी केली. परंतु तक्रारदार यांना आरोपीत लोकसेवक यास लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदार यांनी दिनांक ११/०४/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर कार्यालयात तक्रार दिली आहे.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक ११/०४/२०२२ रोजी आरोपी लोकसेवक यांचेकडे पंचासमक्ष पडताळणी केली असता, आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे सदर कामाचे अनुषंगाने ५००/–रूपये लाचेची मागणी केली. सदर लाचेची रक्कम लागलीच दिनांक ११/०४/२०२२ रोजी १२:४७ वाजताचे सुमारास प्राथमिक आरोग्य केंद्र, तारापूर येथे त्यांचे कार्यालयात तक्रारदार यांचेद्वारे लोकसेवक यांनी स्विकारली असता नमूद आरोपीत लोकसेवक श्री. शरद विलास गायकवाड, यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर कार्यालयाचे सापळा पथकाकडून रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर, पालघर प. ४०१४०४.
संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– dypacbpalghar@gmail.com
ऑनलाईन तक्रार :– ––
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोल फ्री नं. :– 1064
दुरध्वनी क्रमांक :– 02525-297297
व्हॉट्स ॲप क्र. :– 9923346810

(नवनाथ जगताप)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर